# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 16 January 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १६ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- मनपा निवडणूक निकालाचं चित्र बहुतांशी स्पष्ट–भाजप आणि मित्रपक्षांची सरशी
- राज्यात अनेक पक्षांची राजकीय समीकरणं अपेक्षेच्या तुलनेत अयशस्वी
- मराठवाड्यात भाजप तीन तर काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा प्रत्येकी एका मनपावर विजय
- ‘स्टार्टअप इंडिया मिशन’ उपक्रमाची दशकपूर्ती

आणि

- परदेशातील ज्ञानार्जनाचा देशासाठी वापर करण्याचं सरसंघचालकांचं आवाहन

****

राज्यातल्या २९ महापालिकांच्या निवडणूक निकालाचं चित्र बहुतांशी स्पष्ट झालं आहे. भारतीय जनता पक्ष आणि मित्रपक्षांनी सर्वाधिक महापालिकांवर विजय मिळवला तर इतर अनेक पक्षांची राजकीय समीकरणं अपेक्षेच्या तुलनेत यशस्वी झाली नसल्याचं दिसून येत आहे.

मुंबई महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ७० जागांवर आघाडी मिळवली असून शिवसेनेला २१ जागांवर आघाडी आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ४८ तर काँग्रेस १८ जागांवर आघाडीवर आहे. एमआयएम सात तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना पाच जागांवर आघाडीवर आहे.

वसई विरार महानगरपालिकेत ११५ जागांपैकी ७१ जागा जिंकत बहुजन विकास आघाडीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेत भाजप ४३ तर शिवसेना ३७ पक्ष जागांवर आघाडीवर आहे. ठाणे महानगरपालिकेत शिवसेना, तर पनवेल, उल्हासनगर, कल्याण डोंबिवली, पुणे, पिंपरी–चिंचवड महानगरपालिकांमध्येही भारतीय जनता पक्ष आघाडीवर आहे.

नागपूर इथं भाजपला ७४ तर अकोला इथं ३६ जागा मिळाल्या. चंद्रपूर इथं काँग्रेस मित्रपक्षासह २० जागांवर आघाडीवर आहे, तर अमरावती इथं काँग्रेस पक्ष १५ तर भाजप १७ जागांवर आघाडीवर आहेत.

सांगली मिरज कुपवाड महापालिकेत भाजपला ३३ जागा तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला १३ जागा मिळाल्या आहे.

कोल्हापूर मध्ये महायुतीने ४४ जागांवर विजय मिळवला तर इचलकरंजीतही भाजपला ६५ पैकी ४३ जागांवर विजय मिळाला.

सोलापूर इथं ७९ ठिकाणी भाजपाचे उमेदवार निवडून आले आहेत.

अहिल्यानगर इथं भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस युतीने बाजी मारली आहे. एकूण ६८ जागांपैकी भाजपला २५ तर राष्ट्रवादी काँग्रेसला २७ जागा मिळाल्या.

जळगाव मध्ये भाजपला ४६ तर शिवसेना पक्षाला २२ जागा मिळाल्या. धुळ्यातही पन्नास जागांवर भाजप उमेदवार निवडून आले आहेत. नाशिक इथंही भाजप उमेदवार आघाडीवर असून, मालेगाव इथं इस्लाम पक्षाला बहुमत मिळालं आहे.

****

मराठवाड्यातल्या मतदारांनी महानगरपालिकेच्या निवडणुकीत राजकीय पक्षांना संमिश्र कौल दिल्याचं दिसत आहे. पाच महापालिकांमध्ये मतदारांनी काँग्रेस, भाजप, आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सत्ता स्थापनेसाठी आवश्यक संख्याबळ मिळवून दिल्याचं दिसून येत आहे. पाचपैकी भाजपला तीन तर काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला प्रत्येकी एका महापालिकेवर सत्ता स्थापन करता येण्याची चिन्हं दिसत आहेत.

छत्रपती संभाजीनगर इथं सर्वच पक्षांनी ही निवडणूक स्वबळावर लढवली. यात मनपाच्या ११५ जागांपैकी आतापर्यंत भाजपला ५६ तर शिवसेनेला १४ जागा मिळाल्या आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सहा, वंचित बहुजन आघाडीला चार तर काँग्रेस पक्षाला दोन जागा मिळाल्या. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला एक जागा मिळाली. छत्रपती संभाजीनगर मनपात एमआयएम पक्षाला राज्यात सर्वाधिक ३३ जागा मिळाल्या आहेत.

पहिल्यांदाच निवडणूक झालेल्या जालना महापालिकेची सत्ता भारतीय जनता पक्षाने मिळवली आहे. ६५ सदस्य संख्या असलेल्या या महापालिकेत भाजपने ४१ तर शिवसेनेने १२ जागा जिंकल्या. काँग्रेसला नऊ तर एमआयएमला दोन जागांवर विजय मिळाला.

परभणी महापालिकेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची सत्ता स्थापनेकडे वाटचाल होत असल्याचे संकेत आहेत. या पक्षाला इथे सर्वाधिक २७ जागांवर आघाडी आहे, तर भाजपला १३, काँग्रेसला दहा, राष्ट्रवादी काँग्रेसला सहा तर शिवसेनेला दोन जागांवर विजय मिळाला आहे.

लातूर महापालिकेत काँग्रेस पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवलं. ७० सदस्य संख्या असलेल्या लातूर मनपात काँग्रेसनं ४३ जागा जिंकल्या, तर वंचित बहुजन आघाडीला ०४ जागांवर विजय मिळाला. भारतीय जनता पक्षाने २२ तर राष्ट्रवादी काँग्रेसने एका जागेवर विजय मिळवला आहे.

नांदेड महापालिकेत भाजपची स्पष्ट बहुमताकडे वाटचाल सुरू आहे. महापालिकेच्या ८१ जागांपैकी सध्या भाजपला सर्वाधिक ४६ जागांवर आघाडी असून, काँगेसचे उमेदवार आठ जागांवर पुढे आहेत. एमआयएम तसंच वंचित बहुजन आघाडीला प्रत्येकी चार जागांवर आघाडी असल्याचं आतापर्यंत हाती आलेल्या निकालात म्हटलं आहे.

****

महापालिका निवडणुकीत जनतेनं दिलेला कौल स्वीकारत असल्याचं, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलत होते. जनमताचा आदर करत असल्याचं दानवे यांनी सांगितलं, ते म्हणाले –

**बाईट – अंबादास दानवे**

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर मनपा निवडणुकीत अपेक्षित यश मिळवता आलं नसल्याचं, पालकमंत्री संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे. ते छत्रपती संभाजीनगर इथं प्रसार माध्यमांशी बोलत होते. नाही. या निकालावरून पुढे योग्य ती पावलं उचलू आणि पुन्हा नव्याने कामाला लागून यश मिळवू, असं शिरसाट यांनी म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथे तीन प्रभागातल्या मतमोजणी दरम्यान मतदान यंत्रावरच्या तारखेत फरक असल्याचा दावा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार अभय टाकसाळ यांनी केला आहे. याबाबत त्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली असून, या प्रभागांचा निकाल जाहीर करण्याऐवजी फेरमतदान घेण्याची मागणी टाकसाळ यांनी केली आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर इथल्या मतमोजणी केंद्रांवर नागरिकांनी सकाळपासूनच मोठी गर्दी केली होती. निकाल जाणून घेण्यासाठी उत्सुक असलेल्या या गर्दीवर नियंत्रणासाठी पोलिसांना सौम्यबळाचा वापर करावा लागला.

****

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं हज यात्रेकरुंना नियमांची पूर्तता करण्यासाठी २५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. ही अंतिम मुदतवाढ असून, यानंतर कुठल्याही परिस्थितीत ती पुन्हा वाढवली जाणार नाही, असंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. वाढवलेल्या मुदतीत यात्रेकरुंनी आपल्या प्रवासासाठी नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी, आपली पारपत्रं भारतीय हज समितीकडे किंवा संबंधित यात्रा आयोजकांकडे दाखल करावी, असे निर्देशही मंत्रालयानं दिले आहेत.

****

देशातल्या नवउद्योजकांना प्रोत्साहन देणारा 'स्टार्टअप इंडिया मिशन' या उपक्रमानं गेल्या दहा वर्षांत क्रांती घडवून आणली असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. या उपक्रमाला आज दहा वर्ष पूर्ण झाली. यानिमित्त आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रम झाला. यावेळी बोलतांना, आज भारत जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

१६ जानेवारी २०१६ रोजी पंतप्रधानांनी या उपक्रमाला सुरूवात केली होती. नवोन्मेषाला चालना, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि गुंतवणूक-आधारित विकास हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आजपर्यंत भारतात दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्सना मान्यता मिळाली आहे.

****

ज्ञान घेण्यासाठी विदेशात जा, पण त्या ज्ञानाचा भारतासाठी वापर करा, असं आवाहन सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी युवकांना केलं आहे. राष्ट्रीय

स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथं एमआयटी महाविद्यालयात झालेल्या युवा संमेलनात भागवत बोलत होते. भागवत यांनी यावेळी प्रश्नोत्तराच्या माध्यमांतून युवकांशी संवाद साधला. देवगिरी प्रांत संघचालक अनिल भालेराव, विभाग संघचालक मुंजाजी जगाडे यावेळी उपस्थित होते. दरम्यान, आज गंगापूर इथं होणाऱ्या हिंदू संमेलनातही डॉ भागवत मार्गदर्शन करणार आहेत.

****

महिलांसाठी ‘मेनोपॉज क्लिनिक’ सुरू करणारे महाराष्ट्र हे देशात पहिलं राज्य ठरलं असल्याचं, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी म्हटलं आहे. राज्यातल्या सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये ‘मेनोपॉज क्लिनिक’ सुरू करण्यात आलं आहे. प्रत्येक महिलेला या काळात योग्य सल्ला, उपचार आणि सन्मान मिळावा, हाच यामागचा उद्देश असल्याचं बोर्डीकर यांनी सांगितलं.

****